# पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,

चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८

दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१

ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.

(आस्थापना शाखा)


## प्रेसनोट

महाराष्ट्रतील बहुतांश पोलीस घटकात पोलीस भरती प्रक्रिया चालू असून, मैदानी चाचण्या दि.२.१.२०२३ पासून घेण्याबाबत आदेश झाले आहेत. तथापि, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या घटकाच्या आस्थापनेवरील पोलीस भरती दि.६.१.२०२३ रोजी पासून पोलीस शिपाई चालक पदाची भरती प्रकीया सुरु करण्यात येणार आहे. भरती प्रक्रिया ही तटस्थपणे नि:पक्षपातीपणे व पारदर्शक पध्दतीने होणार असून उमेदवाराने कोणत्याही भुलथापांना बळी पडु नये. कोणत्याही व्यक्तीने पैशाची / लाचेची मागणी केल्यास त्याच्यावर विश्वास ठेऊ नये. असा गैरप्रकार आढळुन आल्यास उमेदवारांनी त्याबाबतची माहिती या कार्यालयाच्या लक्षात आणुन दयावी. तसेच सदर भरती प्रक्रियेच्या वेळी संबंधित उमेदवारांनी त्यांनी भरलेल्या आवेदन अर्जसोबत जी कागदपत्रे नमूद केलेली आहेत ती कागदपत्रे मैदानी चाचणी वेळी घेऊन येणे आवश्यक आहे. पोलीस भरतीसाठी ज्या उमेदवारांनी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या घटकामध्ये ऑनलाईन आवेदन अर्ज दाखल केलेले आहेत त्यांनी याबाबत नोंद घ्यावी.

**जनसंपर्क अधिकारी,**

**पुणे ग्रामीण, पुणे**